# जिल्हा परिषद पालघर विधी कक्षासाठी कंत्राटी वकील, मानधन तत्त्वावर नेमणेबाबत.

पालघर जिल्हा परिषद अंतर्गत प्रलंबित न्यायालयीन व अर्धन्यायिक प्रकरणे (सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय, दिवाणी न्यायालय व विभागीय आयुक्त इ. न्यायालयीन प्रकरणे) हाताळण्यासाठी विधी कक्षाकरीता वकिलांची नेमणुका करणे प्रस्तावित आहे.

**पुढील अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांमधून नेमणूक केली जाईल.**

१. उमेदवाराचे वय कमाल ४५ वर्षे व किमान वय १८ वर्षे असावे.

२. बार काऊन्सिल ऑफ इंडिया आणि गोवा यांचे नोंदणीकृत असावा.

३. शैक्षणिक अर्हता (एल. एल. बी/एल.एल.एम) विधी शाखेच्या उच्च पदवीधारकांना प्राधान्य देण्यात येईल.

४. विविध न्यायालयात वकिलीचा अनुभव किमान ५ वर्षे असावा. (जिल्हा परिषदेचा विविध प्रकरणांचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.)

५. जिल्हातील स्थानिक वकील (उपरोक्त अटी व शर्तीची पूर्तता करणारे) यांना प्राधान्य देण्यात येईल. अर्ज करताना पूर्ण नाव, वय, पत्ता, मोबाईल नंबर, शैक्षणिक व कायद्याची पदवी उत्तीर्ण वर्ष, विविध न्यायालयात केलेल्या वकिलीचा अनुभव कालावधी, जिल्हा परिषदेतील न्यायिक प्रकरणांचा अनुभव, सध्या वकिलीच्या व्यवसायाचे ठिकाण इत्यादी तपशील असलेला Bio-Data संबंधित कागदपत्रांसह अर्जासोबत असावा.

सदर पदासाठी अर्ज ही जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर, तळमजला कक्ष क्र.००७, सेक्टर १५, जिल्हा परिषद पालघर, नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जवळ कोळगाव ग्रामपंचायत हद्द, बोईसर रोड, पालघर, जि. पालघर, पिन कोड-४०१४०४ यांचे नावे पोहचतील अशा बेताने पाठवायचे आहेत. तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जाच्या संख्येप्रमाणे लेखी परीक्षा वा मुलाखत घेतली जाईल.

नेमणूक झाल्यास जिल्हा परिषदेने ठरविलेले मानधन मान्य करावे लागेल याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १५/०३/२०२४**
**ठिकाण :- पालघर**

**स्वाक्षरी/-**
**(भानुदास पालवे, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद पालघर**